# इये वेदांताचिये नगरी

श्री. चंद्रशेखर मुद्‌गल

### जगद्‌गुरु आद्य शंकराचार्य जयंती

वैशाख शुद्ध पंचमी म्हणजेच मंगळवार, दिनांक १८ मे २०१० रोजी शंकराचार्य जयंती उत्सव देवस्थानात मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. उत्सवाचे यंदाचे हे २७ वे वर्ष होते. वैशाख शुद्ध प्रतिपदा ते पंचमी असे पाच दिवस आद्य शंकराचार्यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना गर्भगृहात, चांदीच्या मखरात, सुवर्ण छत्रासहित करण्यात आली होती. अनेक भक्तांनी या पाच दिवसांमध्ये मूर्तीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. उत्सवाच्या दिवशी पहाटे शंकराचार्यांच्या पंचधातूच्या मूर्तीवर दुग्धधारेने रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर बिल्वपत्रार्चन करून षोडशोपचारे पूजा व आरती संपन्न झाली.

दुपारी १२ वाजता महाआरती होऊन उपस्थित भक्तांना प्रसादभोजन देण्यात आले.

कार्यक्रमाचे दुसरे सत्र दुपारी ३ वाजता सुरू झाले. या सत्रात महालक्ष्मी सभामंडपात वेदांत विद्यापीठातील गुणवान विद्यार्थ्यांचा सत्कार व शंकराचार्य जयंतीनिमित्त व्याख्यान असे कार्यक्रम झाले. प्रथमत: माननीय प्रमुख पाहुणे आळंदी येथील वेदमूर्ती श्री. श्रीकांतभट्ट चितळे गुरुजी यांचे न्यासातर्फे विश्वस्तांनी स्वागत केले. यानंतर श्री. चितळे गुरुजींच्या हस्ते उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके व पारितोषिकांचे वाटप करण्यात आले. खालील विद्यार्थ्यांना शाखानिहाय विशेष गुणवत्ता पारितोषिके देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| ऋग्वेद : | कु. राजेंद्र पुरुषोत्तम दाणी | ९८.५% |
| | कु.विनायक पुरुषोत्तम दाणी | ९८.५% |
| कृष्ण यजुर्वेद : | कु. गजानन सुरेश देशपांडे | ९६% |
| | कु. प्रसाद प्रकाश कार्यकर्ते | ९६% |
| | कु. अनिरुद्ध रविंद्र जोशी | ९८% |
| सामवेद : | कु. दत्तदास रघुनाथ शेवडे | ९४% |
| | कु. मार्तंड किशोर मालेगावकर | १००% |

वेदांत विद्यापीठाचे प्रधान आचार्य श्री. समीहन कोल्हटकर यांनी श्री. चितळे गुरुजी यांचा परिचय करून दिला. त्याचबरोबर उपस्थितांना विद्यापीठाची वाटचाल व नवीन उपक्रमांची माहिती दिली. यावेळी शास्त्रशाखा व शतपथ ब्राह्मणशाखेच्या परीक्षांचे निकालही जाहीर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कौतुक कार्यक्रमानंतर आद्य शंकराचार्यांच्या जीवनकार्यावर आधारित व्याख्यान झाले. श्री. चितळे गुरुजींनी ओघवत्या वाणीने आचार्यांचा जीवनपट उलगडून दाखवत त्यांच्या अलौकिक कार्यावर प्रकाश टाकला.

### भगवान श्री दत्तात्रेय प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिन

श्री दत्तात्रेयमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनाचे औचित्य साधून लुप्त होत चाललेल्या, अत्यंत अवघड अशा चातुर्मास्य श्रौत यागाचे आयोजन श्री दत्तक्षेत्रात शनिवार, दिनांक ३ जुलै २०१० ते शुक्रवार दिनांक ९ जुलै २०१० या दरम्यान करण्यात आले होते. वेदविद्या संवर्धन व संरक्षण या उद्देशाने हा श्रौतयाग करण्यात आला.

प. पू. गुरुदेवांच्या आशीर्वादाने श्रौतयाग अतिशय यशस्वीपणे संपन्न झाला. भक्तांची पारमार्थिक व ऐहिक उन्नती साधण्याच्या सद्‌हेतूने तसेच परमेश्वराची अधिकाधिक सेवा घडून कृपाशीर्वाद लाभावेत यासाठी संकल्प करण्यात आला होता.

एक वर्षापूर्वी देवस्थानने नाशिक येथील पं. नारायण शास्त्री भानोसे यांच्या मार्गदर्शनाखाली शतपथ ब्राह्मण ग्रंथाचे अध्ययन सुरू केले. त्या अंतर्गत श्रौतयागाचे शिक्षण घेणाऱ्या तेजस जोशी, मंदार शिणगे, मयुर आंबेकर, मंदार देव व योगेश वारे ह्या विद्यार्थ्यांच्या सहयोगाने श्रौतयज्ञ संपन्न झाला. या योगाने विद्यार्थ्यांना यज्ञाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

या यज्ञासाठी भगवान श्री दत्तात्रेयांच्या मंदिरासमोर यज्ञमंडप उभारण्यात आला होता. त्यामध्ये गार्हपत्य कुंड,

दक्षिणाग्नि कुंड, आहवनीय कुंड, सभ्य कुंड, आवसस्थ कुंड अशा पाच मुख्य कुंडांची स्थापना करण्यात आली होती. यज्ञकुंडाभोवती सृष्टीच्या उत्पत्तीचे प्रतीक म्हणून मत्स्यवेदी स्थापल्या होत्या. तसेच यज्ञमंडपाच्या मध्यभागी पात्रसाधनवेदी तयार करण्यात आली होती. या यज्ञाचे मुख्य यजमानपद नाशिक येथील वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध अग्निहोत्री ब्राह्मण बाळकृष्ण आंबेकर व सौ. पुष्पावती आंबेकर या अग्निहोत्री दांपत्याने भूषविले होते. अन्य ब्रह्मवृंदामध्ये यज्ञाचे 'होता' विलास आंबेकर, 'अध्वर्यु' वेदमूर्ती मुकुंद आंबेकर, 'अग्निध्र' तेजस जोशी व 'प्रतिप्रस्थाता' मंदार शिंगणे हे होते.

'चातुर्मास्य श्रौतयाग' या नावाचा खुलासा करताना वेदमूर्ती श्री. शांतारामशास्त्री भानोसे यांनी सांगितले की, ''वर्षामध्ये एकूण ४ पर्व असतात. प्रत्येक पर्वाच्या शेवटी व दुसऱ्या पर्वाच्या प्रारंभी श्रौतयाग करावा असे शास्त्रात सांगितले आहे. परंतु ते शक्य न झाल्यास चारही पर्वांचा मिळून वर्षात एक याग केला जातो म्हणून त्यास चातुर्मास्य याग असे म्हणतात. ज्येष्ठ व आषाढ हा या यागाचा कालावधी आहे.'' या यज्ञाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही सगुणोपासना नसून निर्गुण उपासना आहे त्यामुळेच हा यज्ञ अध्यात्माला पोषक ठरणारा असतो.

सृष्टीच्या आरंभकाळामध्ये ज्या देवतांनी पशू-पक्षी, मनुष्य निर्माण केले त्या देवतांच्या संतुष्टीसाठी असे वैदिक श्रौतयज्ञ केले जातात. श्रौतयज्ञ २१ प्रकारचे असून त्यातील क्रमानुसार हा ३ रा यज्ञ आहे. या यज्ञात एकूण ११ वेळेस अरणीमंथनाद्वारे अग्नी प्रकट करण्यात आला. प्रात:काळ, माध्यान्हकाळ व सायंकाळ अशा त्या त्या काळानुसार आहुती दिल्या गेल्या. तूप, गव्हाचे पीठ व तांदळाचे पीठ अशा हविर्द्रव्याने यज्ञात दिलेल्या आहुतीचा संबंध मानवी शरीराशी व दिनचर्येशी आहे. जगातील आद्य संस्कृतीशी नाते असलेल्या या यज्ञात पूर्व, उत्तर व दक्षिण अशा तीन दिशांना तोंड करून व मुख्यत्वे उभे राहून आहुती दिल्या गेल्या व हवन केले गेले. श्रौतयागामध्ये विषम संख्येत प्रदक्षिणा घालण्याला विशेष महत्त्व आहे. त्यानुसार अनेक भक्तांनी यज्ञाला प्रदक्षिणा घातल्या.

यज्ञाचा शुभारंभ देवस्थानचे विश्वस्त कॅप्टन श्रीकांत धर्माधिकारी यांच्या हस्ते गणपतीपूजन, पुण्याहवाचन व नांदी श्राद्ध करून झाला. प्रारंभी आद्य शंकराचार्य, भगवान श्रीदत्तात्रेय व प. पू. सद्‍गुरु श्रीरामकृष्ण स्वामी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या यज्ञामध्ये चार प्रकारचे पर्वयज्ञ होते. पहिले दोन दिवस म्हणजेच ३ व ४ जुलै रोजी 'वैश्वदेव' पर्वाचे अनुष्ठान झाले. तिसऱ्या दिवशी (५ जुलै) 'वरुणप्रघास' पर्वाचे अनुष्ठान झाले. चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी 'साकमेध' पर्वाचे अनुष्ठान झाले. चारही पर्वात साकमेध पर्व मोठे होते. त्यामध्ये अनेक प्रकारचे लहान लहान इष्टियाग संपन्न झाले. सातव्या दिवशी 'सीरीय' पर्वाने यज्ञाची सांगता झाली. देवदेवता संतुष्ट व्हाव्यात, त्यांची सर्वांवर कृपा व्हावी, धनधान्य वृद्धी व्हावी, पर्जन्यमान सुधारावे, आवश्यक तेवढी पर्जन्यवृष्टी व्हावी व यातून विश्वकल्याण साधावे हाच या चातुर्मास्य श्रौतयागाचा मूळ हेतू आहे. यज्ञातील अग्निदेवतेच्या केवळ दर्शनाने इच्छित मनोकामनांची पूर्ती होते. या 'न भूतो न भविष्यति' अशा यागाचा लाभ अनेक भक्तांनी घेतला.

वर्धापनदिनानिमित्त श्रौतयागाशिवाय प्रतिवार्षिक होणारे यागही संपन्न झाले. या अंतर्गत विष्णुयाग, सुदर्शनयाग, नृसिंहयाग व मूर्तीस शतकलशाभिषेक सोहळा संपन्न झाला. याचे पौरोहित्य वेदमूर्ती श्री. नवाथे गुरुजी यांनी केले. त्यामध्ये २५ ब्रह्मवृंदांचा समावेश होता. दिनांक ४ जुलै २०१० रोजी सुरू झालेल्या ह्या यागांची समाप्ती दिनांक ९ जुलै २०१० रोजी सकाळी ९.३० वाजता पूर्णाहुतीने झाली. त्यानंतर भगवान श्री दत्तात्रेयांच्या मूर्तीस १०८ कलशातील विविध प्रकारच्या जलाने अभिषेक होऊन महापूजा करण्यात आली.

महापूजेनंतर आरती होऊन उपस्थित भक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला.

भगवान श्री दत्तात्रेयमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनानिमित्त वेदमूर्ती विवेकशास्त्री गोडबोले, सातारा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. वर्धापन दिन शब्दाची उकल करून सांगताना शास्त्री म्हणाले, ''स्वत:चा वर्धापन दिन म्हणजेच वाढदिवस. हा तिथीनुसार साजरा करावा. कारण खगोलशास्त्रीय आधारावर जन्माच्या वेळी सूर्य, चंद्र, नक्षत्र यांची स्थिती जशी असते त्याप्रमाणे स्थिती जन्म तिथीच्या दिवशी असते. तारखेशी त्याचा संबंध नसतो.त्यामुळे वर्धापनदिन तिथीने साजरा करणे हेच शास्त्रीय आहे. वाढदिवसाच्या दिवशी मार्कंडेय ऋषींचे पूजन करावे याचे कारण यमाने मार्कंडेयांना सातकल्प इतके आयुष्य प्रदान केले आहे. ४ युगे एकहजारवेळा येऊन गेल्यावर एक कल्प होतो. दीर्घायुष्यासाठी त्याचे पूजन करावे, औक्षण करावे. औक्षण करणे म्हणजे स्वत:तील परमेश्वराला ओवाळणे असा अर्थ आहे. यानंतर शास्त्रींनी श्रौतयागाची माहिती दिली. तसेच कठोपनिषदातील काही श्लोकांवर भाष्य केले.

ॐॐ